गोपनीय

क्रमांक : का.स./बैठक/२६२

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.
दिनांक : २२ ऑगस्ट, २०१९

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०६ ऑगस्ट, २०१९ रोजी झालेल्या २६२व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सचिव,
कार्यकारी समिती

प्रति :

| | | |
|---|---|---|
| मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | अध्यक्ष |
| श्री. जयंत कुमार बांठिया<br>१००३/१००४, १० वा मजला,<br>बिल्डींग नं.३-ए, ग्रीन एकर्स,<br>लोखंडवाला कॉम्प्लेक्स, अंधेरी (प),<br>मुंबई – ४०० ०५३ | - | सदस्य |
| श्री. ना. वि. मेराणी<br>ए/४७, आदर्श नगर,<br>वरळी, मुंबई - ४०० ०२५. | - | सदस्य |
| डॉ. शिरीष संख्ये<br>संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,<br>एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,<br>नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. | - | सदस्य |
| अपर मुख्य सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |
| महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका,<br>मुंबई - ४०० ००१. | - | सदस्य |

..२/-

महानगर आयुक्त - सदस्य
मुं. म. प्र. वि. प्राधिकरण

प्रधान सचिव (१), - सदस्य
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

**निमंत्रित :**

अपर मुख्य सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव,
वित्त विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

-----------xxx-----------

**<u>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या</u>**
**<u>२६२व्या बैठकीचे कार्यवृत्त</u>**

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | **:** | **०६ ऑगस्ट, २०१९ (मंगळवार)** |
| **वेळ** | **:** | **दुपारी ३.३० वाजता** |
| **स्थळ** | **:** | **मा. मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,**<br>**सहावा मजला, मंत्रालय,**<br>**मुंबई – ४०० ०३२.** |

**<u>उपस्थित सदस्य :</u>**

| | | |
|---|---|---|
| श्री. अजोय मेहता<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. जयंत कुमार बाँठीया | - | सदस्य |
| श्री. संजयकुमार<br>अपर मुख्य सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| श्री. आर.ए.राजीव<br>महानगर आयुक्त,<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | - | सदस्य |
| श्री. नितीन करीर<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग, | - | सदस्य |
| श्री. लोकेशचंद्र<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको | - | सदस्य |
| श्री. विजय सिंघल<br>अति.महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका,<br>(महापालिका आयुक्त यांचे प्रतिनिधी) | - | सदस्य |

..२/-

**निमंत्रित :**

डॉ. सोनिया सेठी
अति.महानगर आयुक्त (१)/प्रकल्प संचालक
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय खंदारे
अति.महानगर आयुक्त (२),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. बी.जी.पवार
सह-महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. पी.आर.के.मूर्ती
संचालक (प्रकल्प),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. प्रमोद आहुजा
संचालक (कामे),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती के.विजयालक्ष्मी
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. माधव नागरगोजे
वित्तीय सल्लागार,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. मोहन सोनार
प्रमुख, नगर नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. दिलीप कवठकर
उप-महानगर आयुक्त (प्रशासन)
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. दे.स.पाटोळे
प्रशासकीय अधिकारी,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती सुगंधा पेदे
सचिव, कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

बैठकीच्या सुरुवातीस, महानगर आयुक्त यांनी श्री. अजोय मेहता, मा.मुख्य सचिव यांचे कार्यकारी समितीचे नवे 'अध्यक्ष' तसेच श्री. प्रवीण परदेशी, महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे 'सदस्य' म्हणून स्वागत केले.

त्यानंतर, श्री. डि.के.जैन, माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी कार्यकारी समितीचे अध्यक्ष म्हणून तसेच श्री. अजोय मेहता, माजी महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी सदस्य म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा महानगर आयुक्त यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०२ मार्च, २०१९ रोजी झालेल्या २६१व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०२ मार्च, २०१९ रोजी झालेल्या २६१व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ : मेट्रो मार्ग-५ या मेट्रो मार्गाच्या उन्नत मार्ग व स्थानकांच्या स्थापत्य बांधकामाकरिता पॅकेज क्र.सी.ए.२८ अंतर्गत मागविलेल्या ई-निविदांना मंजूरी देण्याबाबत.**

**३.१** अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना असे नमूद केले की, मुंबई मेट्रो बृहत आराखड्यामधील ३३७.१ कि.मी. मेट्रो मार्गापैकी मेट्रो मार्ग-५ ठाणे-भिवंडी-कल्याण या प्रकल्पासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरिता मे.डापोलोनिया-टाटा या सल्लागार संस्थेला नियुक्त करण्यात आले होते व या संस्थेने ऑक्टोबर, २०१७ मध्ये प्राधिकरणास सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केला. सदर सविस्तर प्रकल्प अहवालानुसार प्रकल्प प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता रु.८४१६.५१ कोटी किंमतीच्या या प्रकल्पास शासन निर्णय क्र. एम.आर.डी-३३१६/प्र.क्र.१३९/नवि-७, दिनांक २१ डिसेंबर, २०१७ अन्वये राज्य शासनाने मान्यता दिली आहे. तसेच प्रकल्पासाठी अंमलबजावणी संस्था म्हणून प्राधिकरणास मान्यता दिली आहे.

सदर प्रकल्पासाठी बोलविण्यात आलेल्या ई-निविदांच्या अनुषंगाने एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या व या निविदांचे लिफाफा ‘अ’ (निविदा व इसारा रक्कम) व ‘ब’ (तांत्रीक प्रस्ताव) हे दिनांक ७ जुन, २०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता ई-निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आले. या प्रकल्पासाठी खालील निविदाकारांनी ई-निविदा सादर केल्या आहेत:-

| अ.क्र. | कंत्राटदारांचे नाव | ई-निविदा सादर करण्यात आल्या |
|---|---|---|
| | | पॅकेज- सी.ए. २८ |
| १ | मे. एनसीसी लिमीटेड | ✓ |
| २ | मे. अॅफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर्स लि. | ✓ |
| ३ | मे. लार्सन अॅन्ड टुब्रो लि. | ✓ |
| | **एकूण** | **०३** |

ई-निविदांच्या पात्रतेची व तांत्रिक प्रस्तावांची छाननी प्राधिकरणांतर्गत संबंधित अधिका-यांमार्फत करण्यात आली व त्या संदर्भातील अहवाल दिनांक १६ जुलै, २०१९ रोजी सादर करण्यात आला.

सदर अहवालानुसार निविदाकारांच्या पात्र/अपात्रतेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

**पॅकेज क्र. सी.ए.२८**

| अ.क्र | कंत्राटदारांचे नाव | तपशिल |
|---|---|---|
| १ | मे. एनसीसी लिमीटेड | पात्र |
| २ | मे.ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर्स लि. | पात्र |
| ३ | मे. लार्सन ॲन्ड टुब्रो लि. | पात्र |
| | **एकूण** | **पात्र-३** |

पॅकेज क्र. सी.ए.२८ अंतर्गत तांत्रिकदृष्ट्या पात्र तिन्ही निविदाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा 'क'-आर्थिक प्रस्ताव) दिनांक २३ जुलै, २०१९ रोजी ई-निविदाकारांच्या उपस्थित प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आले होते. उघडलेल्या सर्व ई-निविदा लिफाफा 'क' आर्थिक प्रस्तावांची छाननी प्राधिकरणांतर्गत संबंधित अधिका-यांच्या मार्फत करण्यात आली. प्राप्त आर्थिक प्रस्तावांच्या अनुषंगाने निविदाकारांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे :-

**पॅकेज क्र. सी.ए.२८**

| अ.क्र | कंत्राटदारांचे नाव | निविदेची रक्कम (रु. कोटी) | प्राप्त देकार (रु. कोटी) | % कमी/अधिक (-)/(+) |
|---|---|---|---|---|
| १ | मे. एनसीसी लिमीटेड | ८७६.७९ | ९७७.५३ | (+)११.४९ |
| **२** | **मे.ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर्स लि.** | | **८९९.१९** | **(+)२.५५ (L1)** |
| ३ | मे. लार्सन ॲन्ड टुब्रो लि. | | ९५४ | (+)८.८१ |

त्यानंतर अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी पुढे असे नमूद केले की, पॅकेज क्र.सी.ए.२८ मध्ये लघुत्तम बोली असलेल्या मे.ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर्स लि. हे निविदेतील सर्व अटींचे पालन करणारे निविदाकार असून त्यांचा रु.८९९.१९ कोटी रक्कमेचा लघुतम देकार अंदाजपत्रकीय किंमतीच्या म्हणजेच रु.८७६.७९ कोटीच्या तुलनेत २.५५% जास्त दराचा आहे. सदर लघुत्तम निविदाकाराचा देकार पुढीलप्रमाणे आहे:-

| पॅकेज क्र. | कंत्राटदाराचे नाव | निविदेची रक्कम (रु. कोटी) | प्राप्त लघुतम देकार (रु. कोटी) | % कमी / अधिक (-)/(+) |
|---|---|---|---|---|
| पॅकेज-सी.ए.२८ | ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर्स लि. | ८७६.७९ | ८९९.१९ | (+) २.५५% |

मेट्रो प्रकल्पाकरिता प्राप्त झालेल्या निविदांचे तांत्रीक व आर्थिक प्रस्तावांची प्राधिकरण स्तरावर पृथ:करण करुन निविदा स्विकृती संदर्भात शिफारस करण्याकरीता प्राधिकरणांतर्गत अतिरिक्त महानगर आयुक्त -१ तथा प्रकल्प संचालक यांच्या अध्यक्षतेखाली निविदा शिफारस समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीमध्ये (१) संचालक (कार्य), मेट्रो (२) वित्तीय सल्लागार (३) संचालक (प्रणाली), मेट्रो (४) मुख्य अभियंता, नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्र, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचा समावेश आहे. मेट्रो मार्ग-५ प्रकल्पासाठी प्राधिकरणांतर्गत संबंधित अधिका-यांमार्फत तयार करण्यात आलेला तांत्रिक छाननी अहवाल व प्राप्त झालेले आर्थिक प्रस्ताव सदर निविदा शिफारस समिती पुढे दिनांक ३० जुलै, २०१९ रोजी आयोजित केलेल्या बैठकीत सादर करण्यात आले व त्यावर सर्व समावेशक चर्चा होऊन असे ठरले की, लघुत्तम देकार सादर केलेल्या मे. ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर्स लि. यांना त्यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.५५% जादा दराने सादर केलेल्या निविदेच्या अनुषंगाने खुलासा सादर करण्याची विनंती करण्यात यावी व त्यांना वाटाघाटीसाठी बोलाविण्यात यावे. त्यानुसार मे. ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर्स लि. यांनी त्यांच्या दिनांक २६ जुलै, २०१९ व ०१ ऑगस्ट, २०१९ च्या पत्रान्वये खुलासा सादर केला. सदर खुलासाच्या अनुषंगाने दिनांक ०२ ऑगस्ट, २०१९ रोजी आयोजित निविदा शिफारस समितीच्या बैठकीत संबंधित निविदाकाराबरोबर वाटाघाटी करण्याकरिता सविस्तर चर्चा करण्यात आली व त्यांची बोली काही प्रमाणात कमी करण्याबाबत विनंती करण्यात आली. सदर विनंतीच्या अनुषंगाने मे. ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर्स लि. यांनी त्यांच्या निविदेत सादर केलेल्या एकुण प्रकल्पीय किंमतीमध्ये रू.१ कोटी कमी करण्याचे मान्य केले व तसे त्यांच्या दिनांक ०२ ऑगस्ट, २०१९ च्या पत्रान्वये प्राधिकरणास कळविले. त्यामुळे न्युनतम निविदाकार मे.ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर्स लि. यांची सुधारित लघुत्तम बोली रू. ८९८.१९ कोटी इतकी झाली.

**३.२** महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचा शासन निर्णय क्र.संकिर्ण/२०१८/ प्र.क्र. ४७/रस्ते-५, दिनांक ०१ नोव्हेंबर, २०१८ अन्वये ज्या दिनांकास निविदा स्विकृत करावयाची आहे त्या दिनांकास प्रचलित असणाऱ्या दर सुची प्रमाणे प्रकल्प किंमत अद्ययावत करून प्राप्त निविदा बोलीशी तुलना करावी असे निर्देश देण्यात आले आहेत. भारत सरकारच्या गृहनिर्माण व शहरी विकास मंत्रालय(MoHUA), यांचा अहवाल क्र. १४०११/२३/२०१६-MRTS-Coord दिनांक १९ फेब्रुवारी, २०१९ मध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रतिवर्ष ५% प्रमाणे अंदाजपत्रकीय

किंमत दिनांक ३१ जुलै २०१९ पर्यंत अद्ययावत केली असता ती रक्कम रूपये ९०९.६७ कोटी इतकी परिगणीत झाली. सदर सुधारित अंदाजपत्रकीय रक्कमेची मे. ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर्स लि. यांनी वाटाघाटी दरम्यान कमी केलेल्या रूपये ८९८.१९ कोटी या प्राप्त लघुत्तम देकारा बरोबर तुलना केली असता सदर देकार सुधारित अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा (-) १.२६% कमी दराचा असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. त्यामुळे उपरोक्त वस्तुस्थितीचा विचार करून निविदा शिफारस समितीने मे. ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर्स लि. यांचा सर्व करांसहीत रूपये ८९८.१९ कोटी रक्कमेचा लघुत्तम देकार वाजवी असल्याचे व स्वीकृत करण्यास योग्य असल्याची शिफारस केली आहे, असेही निदर्शनास आणून देण्यात आले.

**निर्णय :- सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १३७५ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून कार्यकारी समिती याद्वारे पॅकेज- सी.ए.२८ साठी **मे. ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर्स लि.** यांच्या रू. **८९८.१९** कोटी रक्कमेच्या सुधारित देकाराची, वस्तू व सेवा कराच्या किंवा इतर करांच्या दरामध्ये निविदा प्राप्त होण्याच्या दिनांकापासून आत्तापर्यंत झालेले बदल व कंत्राटीय कालावधीत आणखी बदल झाल्यास कंत्राटीय तरतूदीनुसार कंत्राटीय किंमतीमध्ये वेळोवेळी योग्य ते समायोजन करण्याच्या अधिन राहून, स्विकारण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणा-या संभाव्य अर्थिक बदलासह अधिदान करण्यास देखील मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** कार्यकारी समितीच्या या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीची प्रतिक्षा न करता मे. ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर्स लि. यांना त्यांच्या सुधारित न्युनत्तम बोली रु. ८९८.१९ कोटीच्या अनुषंगाने स्विकृती पत्र देण्याच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.४ : मेट्रो मार्ग-९ (दहिसर (पूर्व) ते मीरा-भाईंदर व अंधेरी (पूर्व) ते सी.एस.आय.ए.) तसेच मेट्रो मार्ग-५ च्या ठाणे ते भिवंडी भागाच्या स्थापत्य कामाच्या अंमलबजावणीकरीता साधारण सल्लागाराची (General Consultant) नेमणूक करणेबाबत.**

४.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी असे सांगितले की, मेट्रो मार्ग ९ व ७-अ यास प्राधिकरणाच्या दि. २९ मार्च, २०१७ रोजीच्या १४२ व्या बैठकीत तसेच मंत्रीमंडळाच्या दि.११ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या बैठकीत अंदाजित केलेल्या रु. ६६०७ कोटी मूळ किंमतीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. मेट्रो मार्ग ५ साठी अंदाजीत केलेल्या रु. ८४१६.५१ कोटी (सन २०१६ च्या भाव पातळीनुसार) मूळ किंमतीच्या खर्चास प्राधिकरणाच्या दि. १९ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या १४१ व्या बैठकीत तसेच मंत्रीमंडळाच्या दि. २१ डिसेंबर, २०१७ रोजीच्या बैठकीत प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. वरील मेट्रो मार्गांच्या स्थापत्य कामाच्या अंमलबजावणीकरीता साधारण सल्लागाराची नियुक्ती करण्याकरीता ई-निविदा मागविण्यासाठी दैनिक सकाळ तसेच हिंदुस्थान टाईम्स या वृत्तपत्रात दिनांक १५ सप्टेंबर, २०१८ रोजी ई-निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली. प्रचलित पध्दतीनुसार निविदा पूर्व बैठक घेवून उपस्थित केलेल्या बाबींचे स्पष्टीकरण व इतिवृत्त प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले. ई-निविदा प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख ०४ डिसेंबर, २०१८ होती. दिनांक ०४ डिसेंबर, २०१८ रोजी ६ ई-निविदा प्रस्ताव प्राप्त झाले. दिनांक ०६ डिसेंबर, २०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता लिफाफा ‘अ’ (निविदा किंमत) व ‘ब’ (तांत्रिक प्रस्ताव) निविदाकारांच्या उपस्थितीत उघडण्यात आले, ज्यामध्ये खालील निविदाकारांनी ई-निविदा प्रस्ताव सादर केले :-

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव |
|---|---|
| १ | Consortium of M/s. AYESA Ingenieria y Arquitectura S.A.U, Spain, M/s. Korea Rail Network Authority, Korea & M/s. Ayesa India Private Limited, India |
| २ | Consortium of M/s. DB Engineering & Consulting GmbH & M/s. Geodata Engineering S.p.A |
| ३ | Consortium of M/s. Egis Rail S.A., M/s RITES Limited & Louis Berger Consulting Private Limited |
| ४ | Consortium of M/s. PADECO Co.Limited, M/s. Oriental Consultant Global & M/s. AECOM Singapore Pvt Ltd. |
| ५ | Consortium of M/s. Systra , M/s. Consulting Engineers Group Ltd. and M/s. Systra MVA Consulting (India) Pvt. Limited |
| ६ | Consortium of M/s. SMEC International Pty. Ltd., M/s. YUKSEL Proje Uluslararasi and M/s. MM S.p.A. |

४.२ अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी असेही सांगितले की, प्राप्त झालेल्या ई-निविदाकारांच्या निविदांचे तांत्रिक मुल्यमापन निविदेतील निकषांनुसार करण्यात आले. त्यानुसार निविदाकारांच्या प्राप्त गुणांचा तपशिल खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव | प्राप्त तांत्रिक गुण (७५००) |
|---|---|---|
| १ | M/s. AYESA आणि समुह/संयुक्त उपक्रम | ६६७२.७५ |
| २ | M/s. DB Engg. आणि समुह/संयुक्त उपक्रम | ६५७२.५८ |
| ३ | M/s. Egis Rail S.A. आणि समुह/संयुक्त उपक्रम | ६७१५.३१ |
| ४ | M/s. PADECO आणि समुह/संयुक्त उपक्रम | ६८३३.३३ |
| ५ | M/s. SYSTRA आणि समुह/संयुक्त उपक्रम | ७२२१.८५ |
| ६ | M/s. SMEC आणि समुह/संयुक्त उपक्रम | ६३५७.५८ |

निविदा प्रस्तावातील तरतूदीनुसार ज्या निविदाकारांचे तांत्रिक प्रस्तावाला ८०% वा त्यापेक्षा जास्त गुण मिळतील त्यांचे वित्तीय प्रस्ताव उघडण्यात येतील. तांत्रिक निकषांनुसार सहा निविदाकारांना ८०% पेक्षा जास्त गुण मिळाले असून सहाही निविदाकार तांत्रिकदृष्टया निविदेतील अटींप्रमाणे आर्थिक प्रस्ताव उघडण्यास पात्र झाले. सहा पात्र निविदाकारांचे लिफाफा 'क' (आर्थिक प्रस्ताव) दिनांक १४ फेब्रुवारी, २०१९ रोजी ई-निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आले. प्राप्त वित्तीय प्रस्तावांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी भारतीय रुपयात रुपांतर करण्यात आले आहे. त्यासाठी अंतिम निविदा सादर तारखेच्या २८ दिवस आधीच्या म्हणजेच दिनांक ०६ नोव्हेंबर, २०१९ रोजीचे विनिमय दर (१$ = रु.७३.७० आणि १€ = रु. ८४.७५) घेऊन प्राप्त आर्थिक प्रस्तावांचा रुपयात तपशील खालीलप्रमाणे:-

| अ. क्र. | निविदाकारांचे नाव | प्राप्त आर्थिक प्रस्ताव (लिफाफा 'क' नुसार) | | | | आर्थिक प्रस्ताव (योग्य विनिमय दरानुसार) (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | रुपये घटक | युरो घटक | डॉलर घटक | एकूण (रुपयात) | |
| १ | M/s. AYESA Ingenieria y Arquitectura S.A.U, Spain व इतर | २३२,८०,०७,८०० | १३,३२,००० | १०,८०,००० | २५१,७७,६४,८५८ | २५२,०४,९०,८०० |

| अ. क्र. | निविदाकारांचे नाव | प्राप्त आर्थिक प्रस्ताव (लिफाफा 'क' नुसार) | | | | आर्थिक प्रस्ताव (योग्य विनिमय दरानुसार) (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | रुपये घटक | युरो घटक | डॉलर घटक | एकूण (रुपयात) | |
| २ | M/s. DB Engineering & Consulting GmbH व इतर | २३८,६३,०९,२५८ | ४३,६९,७०० | - | २६४,२१,३३,९२९ | २७५,६६,४१,३३३ |
| ३ | M/s. Egis Rail S.A. व इतर | २६५,७५,१३,८४१ | २८,२९,००० | - | २८८,३८,३३,८४१ | २८९,७२,७१,५९१ |
| ४ | M/s. PADECO व इतर | २०९,४३,९९,३५० | - | - | २०९,४३,९९,३५० | २०९,४३,९९,३५० |
| ५ | M/s. SYSTRA व इतर | २२६,४५,१३,९८० | २०,९६,२०० | - | २४४,२१,६६,९३० | २४४,२१,६६,९३० |
| ६ | M/s. SMEC International Pty. Ltd. व इतर | २१६,५२,९४,१०३ | - | २५,५५,३०४ | २३५,०२,४७,०२३ | २३५,३६,२०,००७ |

त्यानंतर अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी असे सांगितले की, विनंती प्रस्तावास अनुसरुन तांत्रिक व आर्थिक प्रस्ताव संयुक्त करताना तांत्रिक निकषाला ७५% भार आणि आर्थिक निकषाला २५% भार देण्यात आले. त्याप्रमाणे प्राप्त संयुक्त गुण खालील तक्त्यात नमूद करण्यात आले आहेत :-

| अ.क्र | निविदाकाराचे नाव | तांत्रिक गुण (७५००) | आर्थिक गुण (२५००) | संयुक्त गुण (१००००) | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | Consortium of M/s. Systra, M/s. Consulting Engineers Group Ltd. and M/s. Systra MVA Consulting (India) Pvt. Limited | ७२२१.८५ | २१४४ | ९३६५.८५ | १ |
| २ | Consortium of M/s. PADECO Co.Limited, M/s. Oriental Consultant Global & M/s. AECOM Singapore Pvt Ltd. | ६८३३.३३ | २५०० | ९३३३.३३ | २ |
| ३ | Consortium of M/s. AYESA Ingenieria y Arquitectura S.A.U, Spain, M/s. Korea Rail Network Authority, Korea & M/s. Ayesa India Private Limited, India | ६६७२.७५ | २०७७.३७ | ८७५०.१२ | ३ |
| ४ | Consortium of M/s. SMEC International Pty. Ltd., M/s. YUKSEL Proje Uluslararasi and M/s. MM S.p.A. | ६३५७.५८ | २२२४.६६ | ८५८२.२४ | ४ |
| ५ | Consortium of M/s. Egis Rail S.A., M/s. RITES Limited & Louis Berger Consulting Private Limited | ६७१५.३१ | १८०७.२२ | ८५२२.५३ | ५ |
| ६ | Consortium of M/s. DB Engineering & Consulting GmbH & M/s. Geodata Engineering S.p.A | ६५७२.५८ | १८९९.४१ | ८४७१.९९ | ६ |

४.३ अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी पुढे असेही सांगितले की, निविदेतील अटींनुसार तांत्रिक व वित्तीय निकषांत कमाल संयुक्त गुण संपादन करणाऱ्या सल्लागारांचा प्रस्ताव ग्राह्य धरण्याची तरतूद आहे. त्यानुसार M/s. SYSTRA आणि समुह/संयुक्त उपक्रम यांना कमाल संयुक्त गुण मिळाले असून यांचा "रु. २२६,४५,१३,९८०/- + € २०९६२०० + वस्तू व सेवाकर" (रु.२४४,२१,६६,९३० /-) एवढया किंमतीचा देकार आहे. जो निव्वळ प्रकल्प किंमतीच्या (रु. १००१२.२४ कोटी) सुमारे २.४४ % आहे. निविदेतील अटींनुसार कमाल संयुक्त गुण प्राप्त करणाऱ्या निविदाकारास तांत्रिक तसेच आर्थिक वाटाघाटीसाठी बोलाविण्याची तरतूद आहे. त्यानुसार प्राधिकरणाच्या निविदा शिफारस समितीने दि. २५ मार्च, २०१९ रोजी M/s. SYSTRA Consortium यांना बोलविण्यात आले. वाटाघाटीनंतर, M/s. SYSTRA Consortium यांनी, त्यांच्या आर्थिक देकारावर १.५% सूट देण्याची तयारी दर्शविली. हे लक्षात घेता, M/s. SYSTRA Consortium यांचा अंतिम आर्थिक देकार रु. २२३,०५,४६,२७०/- + € २०६४७५७ + वस्तू व सेवाकर (अंदाजे रु. २४०,५५,३४,४२६.००) अधिक निविदेतील तरतुदीनुसार देय असणारा वस्तू व सेवाकर इतका असून जो निव्वळ प्रकल्प किंमतीच्या सुमारे २.४० % आहे.

४.४ श्री. जयंत कुमार बाँठिया, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, M/s. PADECO यांचा आर्थिक देकार न्युनतम असतांनाही त्यांचा विचार का केला गेला नाही? यावर महानगर आयुक्त यांनी माहिती दिली की, मेट्रो प्रकल्पासाठी तज्ञ व अनुभवी सल्लागारांची आवश्यकता आहे. तसेच सल्लागारास आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवरील मेट्रो प्रकल्पांचा अनुभव असणे गरजेचे आहे. यास्तव सल्लागारांचे मुल्यमापन Quality and Cost Based Selection (QCBS) पद्धतीने केले आहे. त्यानुसार M/s.SYSTRA यांना सर्वाधिक गुण प्राप्त झाले आहेत. M/s.SYSTRA Consortium यांना परदेशात दुबई, मनिला, शांघाय, अलजीयर्स येथील व देशात दिल्ली, बँगलोर व मुंबई मेट्रो मार्ग १ या प्रकल्पांचा अनुभव आहे. तसेच प्राधिकरणाच्या मेट्रो मार्ग २ब व मेट्रो मार्ग ४ या प्रकल्पाकरिता M/s.SYSTRA हे संकल्पचित्र सल्लागार (Detail Design Consultant) म्हणून कार्यरत आहेत. M/s.SYSTRA यांच्याकडे अनुभवी व आंतरराष्ट्रीय ख्यातीचे तज्ञ असून M/s. SYSTRA यांची कामगिरी समाधानकारक आहे. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, M/s. PADECO Consortium यांच्या तुलनेने M/s. SYSTRA यांचा तांत्रिक प्रस्ताव अत्यंत सरस आहे. तसेच महानगर आयुक्त यांनी निदर्शनास आणून दिले की, M/s. PADECO वगळता अन्य सल्लागारांचे आर्थिक प्रस्ताव रु. २३५.३६ कोटी ते

रु. २८९.७२ कोटी या श्रेणीत असून, तुलना करणेयोग्य आहेत. मात्र M/s. PADECO यांचा प्रस्ताव रु. २०९.४४ कोटी इतका अपवादात्मक कमी आहे.

४.५ यावर मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सल्लागाराचे मुल्यमापन Objective (उद्देशिय) पद्धतीने केले आहे का अशी विचारणा केली. यावर महानगर आयुक्त यांनी सांगितले की, निविदेतील तरतूदीनुसार Consortium च्या मुल्यमापनांसाठी Experience, Approach & Methodology, Work Plan, Organisation, Claim Management, Training Methodology व Pool of Experts या घटकांचा प्रामुख्याने विचार केला आहे. तसेच तज्ञांचे मुल्यमापन करणेसाठी शैक्षणिक पात्रता, मेट्रो प्रकल्पातील अनुभव, आंतरराष्ट्रीय अनुभव व भाषा या घटकांचा विचार केला असून प्रत्येक घटकांचे गुणांकन केलेले आहे. अशा प्रकारे तांत्रिक प्रस्तावांची छाननी उद्देशीय (Objective) पद्धतीने केलेली आहे.

४.६ श्री. जयंत कुमार बाँठिया, सदस्य, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली की, सर्व देकारांचा विचार करता M/s. SYSTRA यांचा आर्थिक देकार वाजवी आहे का? यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, आर्थिक देकार रु. २०९.४४ कोटी ते रु. २८९.७३ कोटी या श्रेणीत असून सरासरी रु. २४९.५९ कोटी इतकी आहे. M/s. SYSTRA यांचा देकार त्यापेक्षा कमी म्हणजे रु. २४०.५५ कोटी आहे. सदरचा देकार हा एकूण प्रकल्प किंमतीच्या २.४०% इतका असून यात कामाची व्याप्ती ही स्थापत्य कामांपुरती मर्यादित आहे.

४.७ चर्चेअंती, महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, M/s. SYSTRA यांचा प्रस्ताव निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा तसेच संयुक्त तांत्रिक व वित्तीय निकषानुसार निवड झालेला प्रस्ताव सुसंवादी व वाजवी असल्यामुळे M/s. SYSTRA आणि समुह/संयुक्त उपक्रम यांची नेमणूक करण्याचे प्रस्तावित आहे.

**निर्णय :-** **सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**<u>ठराव क्र. १३७६</u> :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे

"Consortium of M/s. Systra, M/s. Consulting Engineers Group Ltd. And M/s. Systra MVA Consulting (India) Pvt. Limited" यांचा रु. २२३,०५,४६,२७०/- + € २०६४७५७ + वस्तू व सेवाकर एवढया किंमतीचा देकार स्विकारण्यास व साधारण सल्लागार (GC) म्हणून नियुक्ती करण्यास तसेच त्या अनुषंगाने करारनाम्यातील होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,**, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी कार्यकारी समितीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीची प्रतिक्षा न करता आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ५: मेट्रो भवन आणि परिचालन नियंत्रण केंद्रासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्ती करणेबाबत.**

५.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या १४७व्या बैठकीत मेट्रो भवन, OCC व मेट्रो प्रशिक्षण केंद्र या इमारतीच्या बांधकामासाठी रु. १०३२.५४ कोटी एवढ्या अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. मुंबई मेट्रो रेल प्रोजेक्टच्या १४ मेट्रो मार्गिकांच्या ३३७.१० कि.मी. मेट्रो मार्गासाठी एका ठिकाणांहून परिचालन करण्यासाठी परिचालन नियंत्रण केंद्र (क्षेत्रफळ सुमारे २४२९३ चौ.मी.) प्रस्तावित केलेले आहे. तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाची मेट्रो प्रशिक्षण संस्था (क्षेत्रफळ सुमारे ९६२४ चौ. मी.), विविध Simulators व मेट्रो निगडीत तांत्रिक कार्यालये (क्षेत्रफळ सुमारे ८०१७१ चौ. मी.) आरे,गोरेगाव येथील प्रस्तावित मेट्रो भवन या इमारतीत एका ठिकाणांहून कार्यरत राहणार आहेत. मुंबई मेट्रो मार्गांची व्याप्ती पाहता १४ मेट्रो मार्गिकांचे परिचालन आंतरराष्ट्रीय दर्जाचे तंत्रज्ञान व उपकरणे वापरून एकाच परिचालन नियंत्रण केंद्रामधून होणे हे जागतिक स्तरावर सर्वोत्तमापैकी एक असणार आहे.

५.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, कार्यकारी समितीच्या दिनांक ०३ मार्च, २०१८ रोजी झालेल्या २५७ व्या बैठकीत गोरेगांव येथील नियोजित मेट्रो भवनच्या इमारतीसाठी आर्किटेक्चरल, स्थापत्य नियोजन व बांधकाम पर्यवेक्षन इ. कामांसाठी सल्लागार मे. टीम वन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड – परकिन्स इस्टमन (जे.व्ही.) यांना नियुक्त करण्यासाठी मान्यता देण्यात आली होती. मे. टीम वन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांनी सदर कामाची व्याप्ती वाढल्यामुळे जसे की, पुर्वीची निविदा मागवितांना प्रस्तावित मेट्रो भवनचा Built Up Area ७५०० चौ.मी. व अंदाजित किंमत

रु. ३१२.५ कोटी एवढी होती. परंतु सद्यास्थितीत प्रस्तावित मेट्रो भवनचा Built Up Area १,१४,०८८ चौ.मी. व अंदाजित किंमत रु. ९१३.९६ कोटी एवढी झाली. सदर कामाची व्याप्ती वाढल्यामुळे मे. टीम वन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, यांची क्षमता पाहता सदर सल्लागारांकडुन Pre Tender Activities पुर्ण केल्यानंतर सल्लागारांचे कंत्राट संपविण्याचा निर्णय घेण्यात आला.

५.३ अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी पुढे असे सांगितले की, सदर प्रकल्पाची निकड लक्षात घेता, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नितांत आवश्यकता असल्यामुळे मेट्रो भवन या इमारतीच्या स्थापत्य कामाच्या अंमलबजावणीकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करण्याकरीता ई-निविदा मागविण्यासाठी दैनिक लोकमत तसेच हिंदुस्थान टाईम्स वृत्तपत्रात दिनांक ०४ मार्च, २०१९ रोजी ई-निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली. प्रचलित पध्दतीनुसार निविदा पूर्व बैठक घेवून उपस्थित केलेल्या बाबींचे स्पष्टीकरण व इतिवृत्त प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले. ई-निविदा प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख १४ मे, २०१९ होती. दिनांक १६ मे, २०१९ रोजी दुपारी ०३.०० वाजता लिफाफा ‘अ’ (निविदा किंमत) व ‘ब’ (तांत्रिक प्रस्ताव) निविदाकारांच्या उपस्थितीत उघडण्यात आले, ज्यामध्ये खालील निविदाकारांनी ई-निविदा प्रस्ताव सादर केले :-

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव |
|---|---|
| १ | Consortium of M/s. Archohm Consults Pvt. Ltd., Noida with AEON Integrated Building Design Consultants LLP, Delhi |
| २ | Consortium of M/s. Epicons Consultant Pvt. Ltd, Mumbai with RALYS Services Consultant, Bangalore |

५.४ तांत्रिक व वित्तीय मूल्यमापन करण्याकरीता महानगर आयुक्त, यांच्या मान्यतेने तांत्रिक मूल्यमापन समिती (Technical Evaluation Committee) गठीत केली होती. तांत्रिक मूल्यमापनानुसार निविदाकारांच्या प्राप्त गुणांचा तपशील खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव | प्राप्त तांत्रिक गुण (१००) |
|---|---|---|
| १ | Consortium of M/s. Archohm Consults Pvt. Ltd., Noida with AEON Integrated Building Design Consultants LLP, Delhi | ८०.९ |
| २ | Consortium of M/s. Epicons Consultant Pvt. Ltd, Mumbai with RALYS Services Consultant, Bangalore | ७७.४ |

ज्या निविदाकारांच्या तांत्रिक प्रस्तावाला ७५% वा त्यापेक्षा जास्त गुण मिळतील त्यांचे वित्तीय प्रस्ताव उघडण्यात येतील असे निविदा प्रस्तावात नमूद केले होते. तांत्रिक निकषांनुसार दोन्ही निविदाकारांना ७५% पेक्षा जास्त गुण मिळाले असून दोन्ही निविदाकार तांत्रिकदृष्ट्या निविदेतील अटींप्रमाणे

आर्थिक प्रस्ताव उघडण्यास पात्र झाले. दोन्ही पात्र निविदाकारांचे लिफाफा 'क' (आर्थिक प्रस्ताव) दिनांक ०१ जुलै, २०१९ रोजी ई-निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आले.

प्राप्त वित्तीय प्रस्ताव (वस्तू व सेवाकरांसह) खालीलप्रमाणे आहेत :-

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव | वित्तीय प्रस्ताव (लिफाफा 'क' नुसार) |
|---|---|---|
| १ | Consortium of M/s Archohm Consults Pvt. Ltd., Noida & AEON Integrated Building Design Consultants LLP, Delhi. | रु. २१,३२,४६,९४५/- |
| २ | Consortium of M/s Epicons Consultant Pvt. Ltd, Mumbai & RALYS Services Consultant, Bangalore. | रु. १२,५१,००,०००/- |

निविदा प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे तांत्रिक व वित्तीय प्रस्ताव संयुक्त करताना तांत्रिक निकषाला ८०% भार आणि आर्थिक निकषाला २०% भार देण्यात आले आहे. त्याप्रमाणे प्राप्त संयुक्त गुण खालील तक्त्यात नमूद करण्यात आले आहेत :-

| अ.क्र | निविदाकारांचे नाव | तांत्रिक गुण (८०) | आर्थिक गुण (२०) | संयुक्त गुण (१००) | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | Consortium of M/s Archohm Consults Pvt. Ltd., Noida & AEON Integrated Building Design Consultants LLP, Delhi. | ६४.७२ | ११.७३ | ७६.४५ | २ |
| २ | Consortium of M/s Epicons Consultant Pvt. Ltd, Mumbai & RALYS Services Consultant, Bangalore. | ६१.९२ | २० | ८१.९२ | १ |

निविदा शिफारस समितीने सादर केलेल्या अंतिम अहवालास मान्यता दिली तसेच निविदा स्विकारण्यास शिफारस केली आहे

५.५ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सुचना केली की, कॅन्टीन, कॉन्फरन्स रुम आदी सुविधांचे सामायिक नियोजन करण्यात यावे जेणेकरुन खर्चात बचत होईल. त्यावर महानगर आयुक्त यांनी सदर सुचनेनुसार अंमलबजावणी करण्यात येईल असे सांगितले.

५.६ चर्चेअंती, महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, निविदेतील अटींनुसार तांत्रिक व वित्तीय निकषांत कमाल संयुक्त गुण संपादन करणाऱ्या सल्लागारांचा प्रस्ताव ग्राह्य धरण्याची तरतूद आहे. त्यानुसार Consortium of M/s. Epicons Consultant Pvt. Ltd, Mumbai & RALYS Services Consultant, Bangalore. यांना कमाल संयुक्त गुण मिळाले असून यांचा

..१६/-

"₹ १२,५१,००,०००/- (वस्तू व सेवाकरांसह)" एवढया किंमतीचा देकार आहे. जो निव्वळ प्रकल्पाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या (₹ ९१३.९६ कोटी) सुमारे १.३६ % आहे. संयुक्त तांत्रिक व वित्तीय निकषानुसार निवड झालेल्या सल्लागाराचा प्रस्ताव वाजवी असल्यामुळे Consortium of M/s. Epicons Consultant Pvt. Ltd, Mumbai & RALYS Services Consultant, Bangalore यांची नेमणूक करण्याचे प्रस्तावित आहे.

**निर्णय :-** **सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१३७७ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे प्रस्तावित मेट्रो भवन व परिचालन नियंत्रण केंद्रासाठी (OCC) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (Project Management Consultant) म्हणून Consortium of M/s. Epicons Consultant Pvt. Ltd, Mumbai & RALYS Services Consultant, Bangalore यांच्या रु.१२,५१,००,०००/- (वस्तू व सेवाकरासह) इतक्या आर्थिक देकारास मान्यता देण्यात येत आहे. तसेच या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी कार्यकारी समितीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीची प्रतिक्षा न करता आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ६:** **मुंबई मोनोरेल [संत गाडगे महाराज चौक – वडाळा – चेंबूर] या मार्गावरील १६ स्थानकांच्या छतावर सुमारे २ मेगावॅट वीज निर्मितीसाठी सौर पीव्ही पॅनेलची सुयोग्य रचना, स्थापत्य काम, चाचणी तसेच संचलन व देखभालीसाठी सुमारे २५ वर्षांच्या कालावधीसाठी RESCO मॉडेल अंतर्गत मे. तेरस न्यू ॲण्ड रिनिवेबल एनर्जी व मे. ध्रुव कन्सल्टन्सी सर्विसेस प्रा.लि. आणि इन्फो वाइब वेंचर्स प्रा.लि यांची संयुक्तरित्या नियुक्त करण्याकरिता प्राधिकरणाची मान्यता मिळणेबाबत.**

६.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांनी असे सांगितले की, मुंबईची वाढती वाहनसंख्या त्याचप्रमाणे रस्त्यावरील दिवसेंदिवस होणारी प्रचंड वाहतूक कोंडी, शिवाय

तीव्र वळणे व चढ उतार तसेच दक्षिण मुंबईतील अति गर्दीच्या व अरुंद भागात अपुरी बस सेवेमुळे होणारे प्रवाशांचे हाल आणि दक्षिण मुंबई व पूर्व मुंबई उपनगरांची जोडणीची निकड लक्षात घेऊन प्राधिकरणाने जलद सार्वजनिक व्यवस्थेला पूरक असणारी मुंबई मोनोरेल प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याचे हाती घेतले. सदर मोनोरेल प्रकल्पाची एकूण लांबी १९.८३ कि.मी. असून एकूण १७ स्थानके (उन्नत) आहेत. प्राधिकरणाने मोनोरेल प्रकल्पाची अंमलबजावणी टप्पा -१ (वडाळा-चेंबूर) आणि टप्पा-२ (वडाळा- संत गाडगे महाराज चौक) या दोन टप्प्यांमध्ये केली. त्याचप्रमाणे टप्पा -१ (वडाळा-चेंबूर) आणि टप्पा-२ (वडाळा- संत गाडगे महाराज चौक) दिनांक २ फेब्रुवारी, २०१४ तसेच दिनांक ४ मार्च, २०१९ रोजी अनुक्रमे प्रवासी वाहतुकीसाठी खुला करण्यात आला.

६.२ अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांनी असेही सांगितले की, सद्यस्थितीत, मुंबई मोनोरेल प्रकल्पाच्या संचलन व देखभालीचे काम प्राधिकरणाने हाती घेतले असून संचलन व देखभालीचा खर्च कमी करून नफा वाढविण्यासाठी प्राधिकरण प्रयत्नशील आहे. मोनोरेल प्रकल्पाची सर्व प्रणाली ही विद्युतीय प्रणालीवर आधारित असल्याने लागणाऱ्या वीजेचा वापर व त्यावरील येणारा खर्च हा संचलन व देखभालीचा एक प्रमुख भाग आहे. सदर मोनोरेल प्रकल्पाकरीता मे. टाटा पॉवर या कंपनीमार्फत प्रत्येकी २२ किलोवॅट विजेचा पुरवठा मिंट कॉलनी आणि मैसूर कॉलनी या वीज प्राप्ती स्थानकांमार्फत (Receiving Station) केला जातो. मे. टाटा पॉवर या कंपनी मार्फत पुरवठा करीत असलेल्या विजेचा मूळदर हा प्रती युनिट रु. ८.५० ते रु. ९.५० एवढा आकारला जातो. तसेच वीज खंडन घटकाच्या (Power Factor) दंडा सहित सदर विजेचा दर हा प्रती युनिट रु. १० ते रू. ११.५० एवढा आकारला जातो. सदर विजेचा वापर हा डेपोवरील उपकरणे (बल्ब, पंखे, वातानुकुलीत उपकरणे, AFC, लिफ्ट, सरकता जिना इ.) तसेच सिग्नल उपकरणे करीता वापरला जाईल. वरील बाबींचा विचार करून प्राधिकरणाने विजेवरील होणाऱ्या खर्चात बचत व कार्बन फूटप्रिंट कमी करणे तसेच प्राधिकरणावर असलेला खर्चाचा बोजा कमी करणे इ. कारणांमुळे, प्राधिकरणाने Renewable Energy Service Company (RESCO) मॉडेल अंतर्गत मुंबई मोनोरेल मार्गावरील एकूण १७ पैकी १६ स्थानकांवरील छतावर २५ वर्षाच्या कालावधीकरीता सौर पॅनल बसविण्याचे कार्य हाती घेतले आहे.

६.३ अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांनी असेही सांगितले की, सौर वीज निर्मितीसाठी मुंबई मोनोरेल मार्गावरील १७ स्थानकांच्या सर्वेक्षणात असे निदर्शनास आले कि, एकूण १७ स्थानकांपैकी (मोनोचे दादर (पूर्व) स्थानक वगळता) १६ स्थानके ही सुसाध्य आहेत. कारण दादर (पूर्व) स्थानकाच्या छतावर येणाऱ्या सावलीमुळे सूर्यप्रकाश कमी असल्याने हे स्थानक वगळण्यात आले.

सदर १६ स्थानकांच्या छतावरील क्षेत्रफळ सुमारे २५६०० चौ. मि. असून सदर क्षेत्रफळानुसार सुमारे २ मेगावॅट सौर वीज निर्मिती होणे अपेक्षित आहे. RESCO मॉडेल नुसार रचना, स्थापत्य काम तसेच संचलन व देखभाल हि सर्व जबाबदारी गुंतवणूकदाराची असते या कारणाने प्राधिकरणाने सदर सौर प्रकल्प RESCO मॉडेल अंतर्गत राबविण्याचे योजले आहेत. या अनुषंगाने प्राधिकरणाद्वारे अग्रगण्य वर्तमान पत्रात जाहिराती देऊन सदर १६ स्थानकांच्या छतावर RESCO मॉडेल अंतर्गत सौर पॅनल बसवून त्यांची २५ वर्षाकरीता देखभाल दुरस्तीकरीता निविदा मागविण्यात आल्या :-

निविदेचे ठळक वैशिष्टे :-

| | |
|---|---|
| १. एकूण वीज निर्मिती | - २ मेगावॅट सौर वीज |
| २. प्रकल्पाचे स्वरूप | - RESCO मॉडेल अंतर्गत सौर पॅनल बसविणे |
| ३. प्रकल्पांचा खर्च | - रु.१२ कोटी |
| ४. प्रती युनिट वीज दर (max) | - रु.५.१० |
| ५. प्रकल्पाचे संचलन व देखभाल | - गुंतवणूकदाराची जबाबदारी |

६.४ अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांनी पुढे असे नमूद केले की, सदर निविदा प्रक्रियेच्या वेळापत्रकानुसार उघडण्यात आल्या, १) मे. वारी एनर्जी लि. मुंबई, २) मे. तेरस न्यू अॅन्ड रिनिवेबल एनर्जी व मे. ध्रुव कन्सल्टन्सी सर्विसेस प्रा. लि. आणि इन्फो वाइब वेंचर्स प्रा.लि. (संयुक्तपणे) यांनी सदर निविदा प्रक्रीयेमध्ये भाग घेतला. वरील संस्थांनी प्रती युनिटकरीता सादर केलेला दर खालील प्रमाणे:-

| अ.क्र. | कंपनी/ संस्थेचे नाव | प्रती युनिट दर (रु.) |
|---|---|---|
| १. | मे. वारी एनर्जी लि. मुंबई | ४.९१ |
| २. | मे. तेरस न्यू अॅन्ड रिनिवेबल एनर्जी एल.एल.पी. व मे. ध्रुव कन्सल्टन्सी सेर्विसेस प्रा. लि आणि इन्फो वाइब वेंचर्स प्रा.लि. (संयुक्तपणे) | ४.२३ |

वरील तक्त्यानुसार मे. वारी एनर्जी एल.एल.पी. लि. मुंबई यांच्या पेक्षा मे. तेरस न्यू अॅन्ड रिनिवेबल एनर्जी एल.एल.पी. व मे. ध्रुव कन्सल्टन्सी सर्विसेस प्रा. लि आणि इन्फो वाइब वेंचर्स प्रा.लि. [संयुक्तपणे], प्रती युनिट वीजेकरीता कमी दर आकारणी केली असल्याने सदर मोनोरेल मार्गाच्या एकूण १६ स्थानकांच्या छतावर २५ वर्षाकरीता सौर पॅनलची रचना, स्थापत्यकाम, संचलन व देखभाल करून २ मेगावॉट पर्यंत सौर वीज निर्मिती करून स्थानकांना वीज पुरवठा करण्याकरिता मे. तेरस न्यू अॅन्ड रिनिवेबल एनर्जी एल.एल.पी. व मे. ध्रुव कन्सल्टन्सी सर्विसेस प्रा. लि आणि इन्फो वाइब वेंचर्स प्रा.लि. यांची (संयुक्तपणे) नियुक्ती करण्याचे प्रस्तावित आहे.

६.५ अति.महानगर आयुक्त (२) यांनी असेही सांगितले की, दरम्यानच्या काळात, नवीन आणि नवीनकरणीय उर्जा मंत्रालय [MNRE] या विभागाचे पत्र प्राधिकरणास अवगत झाले. सदर पत्रान्वये सौर पॅनलच्या एकूण प्रकल्प किंमतीच्या २५% अनुदानाच्या स्वरुपात अर्थ सहाय्य करते. त्यानुसार, मे. तेरस न्यू अॅन्ड रिनिवेबल एनर्जी मे. ध्रुव कन्सल्टन्सी सर्विसेस प्रा.लि. यांनी (संयुक्तपणे) प्रती युनिट सादर केलेला रु.४.२३ प्रति. युनिट दर रु.३.३७ पर्यंत कमी होण्याचे अनुमान आहे.

६.६ अति.महानगर आयुक्त (२) यांनी असे सांगितले की, सदर मोनोरेल प्रकल्पाच्या एकूण १६ स्थानकांवरील सौर वीज निर्मितीमुळे सुमारे रु. १.६१ कोटी ते रू.१.८३ कोटी प्रती वर्षे विजेवर होणाऱ्या खर्चात बचत होणे अनुमानित आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करून मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे निर्देश दिले कि, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग [MERC] यांच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेण्यात याव्यात. तसेच सदर प्रकल्प RESCO मॉडेल ऐवजी मोनोरेल स्थानकाच्या छतांवरील जागेचा लिलाव करून सदर जागा सौर वीज निर्मितीसाठी भाडे तत्वावर देण्याबाबत पुढील कार्यवाही करावी.

**बाब क्र.७ : काळू पाणी पुरवठा प्रकल्प ता-मुरबाड, जि.ठाणे — धरण बांधकामाचा तपासणी अहवालास मान्यता व नक्त वर्तमान मूल्य (NPV) ची रक्कम अदा करणेबाबतची मान्यता.**

७.१ महानगर आयुक्त यांनी सांगितले की, काळू पाणी पुरवठा प्रकल्पातील कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ यांच्या मागणीचा प्रस्ताव असून त्यानुसार मान्यतेस सादर करण्यात आला आहे. कोंकण पाटबंधारे विकास महामंडळातर्फे काळू प्रकल्पाचे करण्यात येणारे धरण बांधकाम याबाबत अति.महानगर आयुक्त (२) यांनी सादरीकरणाच्या सहाय्याने सुरुवातीपासूनचा घटनाक्रम देऊन सविस्तर माहिती दिली.

७.२ महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, दि. १२.१.२०१५ रोजी झालेल्या मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २४४व्या बैठकीतील निर्णयानुसार काळू धरण बांधकामाचा करण्यात आलेला तपासणी अहवाल यावर कों.पा.वि.महामंडळ यांचे अभिप्राय दि.३.१२.२०१८ रोजी प्राप्त झाले असून त्यानुसार प्रकल्पावर झालेला खर्च व तपासणी करुन आलेली रक्कम यातील फरक रु.५.१० कोटी याची वसूली कंत्राटदाराच्या सुरक्षा अनामत रक्कम व इतर थकीत देयकाच्या रक्कमेतून करण्याची कार्यवाही कों.पा.वि.महामंडळ यांनी प्रस्तावित केलेली असून त्यानुसार अहवाल स्विकृतीसाठी ठेवण्यात आला आहे. सध्या प्रकल्पाची लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत

..२०/-

चौकशी सुरु असल्याने दि.८.११.२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रकल्पाच्या धरण बांधकामाची निविदा विखंडीत करण्यात आली व त्यावर कंत्राटदाराने मा.उच्च न्यायालयात रिट याचिका सादर केली असल्याने हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे असे कोंकण पाटबंधारे विकास महमंडळ यांनी नमुद केलेले आहे.

परंतू काळू हा पाणी पुरवठा प्रकल्प मुंबई महानगर क्षेत्राच्या पूर्व उप-प्रदेशातील ठाणे, भिंवडी, कल्याण, डोंबिवली, कुळगांव-बदलापुर व अंबरनाथ या शहरांच्या पाणी प्रश्न सोडविण्यास उपयुक्त असल्याने त्यास गती देण्याच्या दृष्टिने त्यातील वैधानिक मान्यता प्राप्त करुन घेणे गरजेचे असल्याने प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांनी त्यांच्या दि.२१.१२.२०१८ रोजीच्या अर्धशासकिय पत्रान्वये उपरोक्त NPV रक्कमेची मागणी केली आहे व त्यानुसार प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी खालीलप्रमाणे ठेवण्यात आलेला आहे :-

अ) काळू धरण बांधकाम याचा तपासणी अहवाल व त्यावरील जलसंपदा विभागाने परिगणित करुन निश्चित केलेली कामाच्या किंमतीतील तफावत रक्कमेची वसुली ही कंत्राटदाराच्या सुरक्षा अनामत रक्कम व इतर देयकाच्या रक्कमेतुन वसुल करण्याची कार्यवाही या कंत्राटावरील मा.उच्च न्यायालयाचा निकाल व कंत्राटातील अटी व शर्ती यानुसार करण्याची मान्यता.

ब) त्याचप्रमाणे काळू या पाणी पुरवठा प्रकल्पाच्या कामास गती देण्याच्या दृष्टिने व त्यासाठी लागणाऱ्या वैधानिक मान्यता घेण्याकरीता प्रकल्पातील वनजमिनीची नक्त वर्तमान मुल्याची रक्कम (NPV) रु. २५९.१८ कोटी लागणारा निधी कोंकण पाटबंधारे विकास महामंडळास अदा करण्याची मान्यता.

७.३ त्यावर मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली की, सदर प्रकल्प राबविण्यासाठी येणारा एकुण भांडवली खर्च प्राधिकरण करणार आहे का याबाबत प्रथम निर्णय घेणे योग्य राहील. महानगर आयुक्त यांनी त्यानुसार नमुद केले की, याबाबत प्राधिकरणाच्या मागील बैठकीत रु.६६१.०१ कोटीची प्रशासकिय मान्यता घेण्यात आलेली आहे. परंतू या प्रकल्पाचा सध्याच्या सुधारित अंदाजपत्रकानुसार रु.२७८५.१३ कोटी इतका जास्तीचा खर्च येणार असल्याचे

..२१/-

दिसुन येते. मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी त्यावर निर्देशित केले की, यासंदर्भात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व जलसंपदा विभाग यांची त्यांच्या स्तरावर संयुक्त बैठक आयोजित करण्यात यावी व त्यावर सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल.

**<u>बाब क्र.८</u> : <u>ठाणे-नाशिक महामार्ग (रा.म.क्र.३) वरील माणकोली व राजणोली उड्डाणपूलांचे उर्वरीत कामाचे संकल्पन व बांधकाम करणे या कामी मागविण्यात आलेल्या निविदेस मंजूरी देणे.</u>**

८.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या दिनांक ०८/०९/२०११ रोजी झालेल्या १२९ व्या बैठकीतील ठराव क्र. १२६४ अन्वये ठाणे-नाशिक महामार्ग (रा.म.क्र.३) वरील माणकोली व राजणोली उड्डाणपुलांचे बांधकाम करणे या कामास व त्यासाठी रु. १८८ कोटी इतक्या किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. कार्यकारी समितीच्या दिनांक ११/०१/२०१२ रोजी झालेल्या तहकूब २३३ व्या बैठकीतील ठराव क्र. ११९५ अन्वये सदर कामासाठी मे. सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांची रु. १२१ कोटी रक्कमेच्या न्युनत्तम निविदेस मंजूरी प्रदान करण्यात आली होती. त्या अनुषंगाने कंत्राटदारास सदर काम २१ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करण्यासाठी दिनांक १०/०५/२०१३ रोजी कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आला होता.

८.२ अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी असेही सांगितले की, सदर प्रकल्पांतर्गत राजणोली व माणकोली या दोन चौकांचे ठिकाणी प्रत्येकी ६६६ मी. व ६५० मी. लांबीचे ४+४ मार्गिकांचे उड्डाणपुल बांधणे आणि उड्डाणपुलांच्या दोन्ही बाजुकडील स्लिप व सेवा रस्त्यांचे बांधकाम करणे या कामांचा समावेश होता. यापैकी माणकोली येथील उजव्या बाजुकडील चार मार्गिकांच्या उड्डाणपुलाचे काम दि. ०८ एप्रिल, २०१७ रोजी पूर्ण करुन यावरुन दोन्ही दिशेंकडील वाहतुक सोडण्यात आली. तद्नंतर ठेकेदाराच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे काम पूर्ण होऊ न शकल्याने सदर कंत्राट दोन टप्प्यात संपुष्टात आणण्यात आले. प्रथम टप्प्यात राजणोली येथील उजव्या बाजुच्या चार मार्गिकांच्या उड्डाणपुलाचे कामाकरीता यापुर्वीच निविदा प्रक्रिया करुन सदर काम मे.आर.पी.एस. इन्फ्राप्रोजेक्टस प्रा. लि. यांना दि. २५/०१/२०१९ रोजी कार्यादेश देऊन सुरु करण्यात आले. सदर कामाची स्विकृत निविदा रक्कम रु. २३.५५ कोटी इतकी आहे. सद्यस्थितीत सदर काम प्रगतीपथावर असून माहे ऑगस्ट, २०१९ अखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे. तद्नंतर उड्डाणपुलाच्या या भागावरुन दोन्ही दिशेंकडील वाहतूक सोडण्यात येईल.

८.३ अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी सद्य निविदेबाबत माहिती देताना सांगितले की, माणकोली व राजणोली उड्डाणपुलांच्या डाव्या बाजूंच्या चार मार्गिकांचे काम तसेच इतर संलग्न कामे शिल्लक असून सदर कामे करण्याकरीता दि. ०८/०१/२०१९ रोजी रु. ५८,११,४५,९८८/- रक्कमेच्या कामाकरीता निविदा मागविण्यात आली होती. या निविदेमध्ये रु. ४३,८८,६९,२३०/- या रक्कमेची राजणोली व माणकोली उड्डाणपुलांची उर्वरीत व संलग्न कामे ही मे. सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांच्या जोखिम खर्चावर आधारीत आहेत. तसेच दोन्ही उड्डाणपुलांच्या बंधनकारक गाळ्यांची कामे स्टिलमध्ये करण्याचा बदल झाला असल्यामुळे रु. १४,२२,७६,७५८/- किंमतीची कामे मे. सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांच्या जोखिम खर्चावर आधारीत नाहीत. या निविदा प्रक्रियेत एकच निविदाकार मे. आर.पी.एस. इन्फ्राप्रोजेक्टस् प्रा. लि. या निविदाकाराची निविदा प्राप्त झाली. त्यामुळे सदर निविदा प्रक्रिया रद्द करुन अंदाजपत्रकिय किंमत रु. ५८,११,४५,९८८/- करीता पुन:श्च दुसऱ्या बोलीकरीता दि. २०/०२/२०१९ रोजी निविदा मागविण्यात आल्या. प्राप्त निविदा दि. ०५/०३/२०१९ रोजी उघडल्या असता तीन निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदाकारांच्या आर्थिक देकारांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे :-

निविदा अंदाजपत्रकिय किंमत रु. ५८,११,४५,९८८/- (सन २०१०-११ च्या दरसुचीवर आधारीत, **वस्तु व सेवा करासहीत**)

| **अ. क्र.** | **निविदाकारांचे नाव** | **प्राप्त आर्थिक देकार (वस्तू व सेवा करासहीत)** | **शेरा** |
|---|---|---|---|
| १ | मे.आर.पी.एस. इन्फ्राप्रोजेक्टस् प्रा. लि. | रु. ९७,१०,००,००१/- (६७.०८% अधिक) | **प्रथम लघुत्तम** |
| २ | मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस् प्रा. लि. | रु. १०४,०९,५७,७५६/- (७९.१२% अधिक) | तृतीय लघुत्तम |
| ३ | मे. मिशिगन इंजिनिअर्स प्रा. लि. | रु. ९८,०१,००,०००/- (६८.६५% अधिक) | द्वितीय लघुत्तम |

प्राप्त निविदांमधील मे. आर.पी.एस. इन्फ्राप्रोजेक्टस प्रा. लि. यांनी सादर केलेली रु. ९७,१०,००,००१/- ची निविदा लघुत्तम आहे. सदर देकार हा निविदा रक्कमेपेक्षा ६७.०८% अधिक आहे. निविदा अंदाजपत्रकीय किंमत रु. ५८,११,४५,९८८/- सन २०१०-११ च्या दरसुचीवर आधारीत होती. या अंदाजपत्रकीय रक्कमेस सन २०१८-१९ च्या दरसुचीतील दरांनुसार अद्ययावत केले असता अंदाजपत्रकीय रक्कम रु. ७५.८२ कोटी (वस्तू व सेवा करासहीत) इतकी येते.

मे. आर.पी.एस. इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि.यांनी सादर केलेला रु. ९७,१०,००,००१/- चा देकार राज्य दरसूची सन २०१८-१९ सोबत तुलना केली असता देकार २८.१ % अधिक असल्याचे अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी सांगितले.

८.४ अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी सदर कामाच्या निविदा समिती प्रकियेबाबत माहीती देताना असे सांगितले की, सदरच्या आर्थिक देकारासंबंधी निविदा समितीच्या बैठकीत निविदाकार मे.आर. पी. एस. इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. यांना सदर देकाराबाबत स्पष्टीकरण देणे व देकाराबाबत वाटाघाटी करणेच्या सुचना देण्यात आल्या. या सुचनेनुसार मे.आर. पी. एस. इन्फ्राप्रोजेक्टस प्रा. लि. यांनी वाढीव देकाराबाबत स्पष्टिकरण सादर केले. कामाचे सल्लागार मे. टेक्नोजेम कन्सल्टंट यांनी स्पष्टीकरणाचा अभ्यास करुन निविदाकाराचा आर्थिक देकार सन २०१८-१९ च्या दरसुचीवर आधारीत रु. ७५.८२ कोटी या रक्कमेस तुलना करुन तो १६.१३ % अधिक पर्यंत ग्राह्य धरणे शक्य असल्याचे कळविले.

वरील बाबींचा विचार करुन निविदा समितीने बैठकीत निविदाकारास वाटाघाटी करणेसाठी विनंती केली. तसेच त्यांना यापूर्वी देण्यात आलेल्या राजणोली उड्डाणपुलाच्या उजव्या बाजुचे काम २०.९९% अधिक दराने मंजूर करण्यात आले असल्याने या दरापर्यंत देकार कमी करणेबाबत विनंती केली. यानुसार मे.आर.पी.एस.इन्फ्राप्रोजेक्टस् प्रा. लि. यांनी त्यांचा देकार कमी करुन आर्थिक देकार रु. ९५,५०,००,०००/- मान्य असल्याचे कळविले. सदर रक्कम सन २०१८-१९ च्या दरसुचीवर आधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा २५.९६% अधिक आहे. तद्नंतर दि.१०/०७/२०१९ रोजी झालेल्या निविदा समितीच्या पाचव्या बैठकीदरम्यान निविदा समितीने निविदाकाराने वाटाघाटीने कमी केलेल्या दराविषयी स्पष्टीकरण देणे तसेच सदर देकार आणखी कमी करणेबाबत विनंती केली. या विनंती नुसार मे.आर.पी.एस. इन्फ्राप्रोजेक्टस् प्रा.लि. यांनी त्यांचा देकार अतिरिक्त रु.१.० कोटी रक्कमेने कमी करण्यास सहमती दर्शविली. त्यानुसार आर्थिक देकाराची अंतिम रक्कम रु.९४,५०,००,०००/-इतकी आहे.

८.५ अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी याबाबत अधिक माहीती देताना असे सांगितले की, दि. ०१ जुलै, २०१९ पासुन राज्य शासनाची सन २०१९-२० ची दरसूची प्रसिद्ध झाल्यामुळे या दरसुचीवर आधारीत अद्ययावत अंदाजपत्रकीय रक्कमेशी आर्थिक देकाराची तुलना करणे योग्य असल्याचे ठरले. त्यानुसार सल्लागारांनी निविदा अंदाजपत्रक सन २०१९-२० च्या दरसुचीनुसार अद्ययावत केले असून त्यानुसार अंदाजपत्रकीय रक्कम रु. ८१.५९ कोटी (वस्तु व सेवा करासह) इतकी असल्याचे सांगितले.

रु.८१.५९ कोटी या रक्कमेशी निविदाकाराच्या देकाराची तुलना केली असता तो १५.८२% अधिक आहे. तसेच निविदाकाराने सादर केलेल्या स्पष्टीकरणाची सन २०१८-१९ च्या दरसुचीवर आधारीत १६.१३% अधिकची ग्राह्य तुलना सन २०१९-२० च्या दरसुचीवर आधारीत अद्ययावत केली असता १८.८९% अधिक ग्राह्य ठरेल असे सांगितले. निविदेबाबत माहिती पुढीलप्रमाणे :-

| क्र. | निविदेची माहिती | रक्कम |
|---|---|---|
| १ | निविदा अंदाजपत्रकीय रक्कम (वस्तु व सेवा करांसह ) | रु. ५८.११ कोटी |
| २ | मुळ सादर लघुत्तम आर्थिक देकार (वस्तु व सेवा करांसह ) | रु. ९७.१० कोटी |
| ३ | वाटाघाटीने कमी करण्यात आलेला आर्थिक देकार (वस्तु व सेवा करांसह ) | रु. ९४.५० कोटी |
| ४ | सन २०१९-२०च्या राज्य दरसुचीनुसार अद्ययावत अंदाजपत्रकीय रक्कम (वस्तु व सेवा करांसह ) | रु.८१.५९ कोटी |
| ५ | अंतिम आर्थिक देकार व अद्ययावत अंदाजपत्रकीय रक्कमेची तुलना | १५.८२%अधिक |

८.६ अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी असेही सांगितले की, या प्रकरणी निविदा समितीने खालील विशेष बाबी विचारात घेतल्या :-

१. सदर कामासाठी ही व्दितीय बोली असुन सदर काम दोन ठिकाणी विखुरलेले आहे. त्यामुळे निविदाकार निविदा प्रक्रियेत सहभागी होण्याकरीता उदासीन आहेत.

२. प्रक्रियेत प्राप्त व्दितीय लघुत्तम बोली रु. ९८.०१ कोटी इतक्या रक्कमेची आहे. प्रथम व व्दितीय लघुत्तम बोलींमध्ये फक्त रु. ९१ लाखांचा फरक आहे.

३. शासनाची सन २०१९-२० ची दरसुची नुकतीच प्रसिध्द झाल्यामुळे निविदा नव्याने तिसऱ्यांदा मागविल्यास कमी दराची बोली येईल याची खात्री वाटत नाही.

४. सदरचे काम राष्ट्रीय महामार्गावर असल्याने काम लवकर व्हावे यासाठी लोकप्रतिनिधी आणि जनतेची तीव्र स्वरुपाची मागणी असल्यामुळे काम पुर्णत्वाचा कालावधी सहा महिन्यांचा आहे.

सदर कामाचा कालावधी केवळ सहा महिने असल्याने या कालावधीत काम पूर्ण करण्यासाठी लागणारे अतिरिक्त स्टेजिंग, शटरींग, यंत्रसामग्री, ओव्हरहेड, इ. बाबींचा विचार करुन सल्लागारांनी सदर देकार १८.८९% अधिक पर्यंत ग्राहय धरता येऊ शकतो असे अभिप्राय सादर केले आहेत. निविदाकार मे. आर.पी.एस इन्फ्राप्रोजेक्टस प्रा. लि. यांनी वाटाघाटीने कमी केलेला रु ९४.५० कोटींचा आर्थिक देकार सन २०१९-२० च्या दरसुचीवर अद्ययावत अंदाजपत्रकाशी तुलना केली असता १५.२८% अधिक आहे.

वरील मुद्दे विचारात घेऊन निविदा समितीने सदर बाब कार्यकारी समितीच्या मंजुरीकरिता सादर करण्याची शिफारस केली असल्याचे अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी सांगितले.

८.८ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सदर कामी निविदा जुन्या दराने मागविण्याबाबत विचारणा केली असता, महानगर आयुक्त यांनी सदर काम पूर्वीच्या ठेकेदाराच्या जोखीम खर्चावर आधारित असल्याने व जोखीम खर्च परिगणित करणेसाठी कामाचे अंदाजपत्रक त्यावेळच्या म्हणजेच सन २०१०-११ च्या दरसुचीवर आधारित असल्याचे सांगितले. तसेच मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सदर कामी मे. सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांचे कंत्राट संपुष्टात आणण्यापूर्वी त्यांनी पूर्ण केलेल्या कामाची संयुक्त मोजणी केली असणेबाबत विचारणा केली असता सदर संयुक्त मोजणी ठेकेदाराच्या प्रतिनिधी सोबत केली असल्याची माहिती महानगर आयुक्त यांनी दिली.

वरील बाबींचे अवलोकन करुन अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी 'ठाणे-नाशिक महामार्ग (रा.म.क्र.३) वरील माणकोली व राजणोली उड्डाणपुलांचे उर्वरीत कामाचे संकल्पन व बांधकाम करणे' या कामासाठी प्राप्त झालेली व वाटाघाटीने कमी केलेली मे. आर.पी.एस. इन्फ्राप्रोजेक्टस प्रा. लि. यांची रु. ९४.५० कोटी ( निविदा अंदाजपत्रकीय रक्कम रु. ५८.११ कोटी पेक्षा ६२.६०% अधिक दराची तसेच सन २०१९-२० च्या दरसुचीवर आधारीत अद्ययावत अंदाजपत्रकीय रक्कम रु. ८१.५९ कोटी पेक्षा १५.८२% अधिक) रक्कमेची निविदा कार्यकारी समितीच्या मंजुरीसाठी सादर केली असल्याचे नमूद करून प्रस्तावास मंजूरी द्यावी अशी विनंती केली.

**निर्णय :-** **चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजुर केला :-**

**<u>ठराव क्र :- १३७८ :</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम, (३) चे पोटकलम (३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत व त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे 'ठाणे-नाशिक महामार्ग (रा.म.क्र.३) वरील माणकोली व राजणोली उड्डाणपुलांचे उर्वरीत कामाचे संकल्पन व बांधकाम करणे' या कामी प्राप्त झालेली व वाटाघाटीने कमी केलेली मे. आर.पी.एस. इन्फ्राप्रोजेक्टस् प्रा. लि. यांची रु. ९४.५० कोटी रक्कमेची (निविदा अंदाजपत्रकीय रक्कम रु. ५८.११ कोटी पेक्षा ६२.६०% अधिक दराची तसेच सन २०१९-२० च्या दरसुचीवर आधारीत अद्ययावत अंदाजपत्रकीय रक्कम रु. ८१.५९ कोटी पेक्षा १५.८२% अधिक दराची) निविदा स्विकृत करण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटीप्रमाणे अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत

आहे. तसेच सदर कामाची निकड लक्षात घेता बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीची प्रतिक्षा न करता पुढील कार्यवाही तात्काळ सुरु करण्यास मान्यता देत आहे."

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.९ : महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर एका सदस्याचे नामनिर्देशन करण्याबाबत**

९.१ सदर बाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेच्या नियमावलीच्या नियम क्र.९ च्या पोट-नियम क्रमांक (अकरा), (बारा) आणि (तेरा) नुसार पर्यावरण शिक्षण, वनस्पतीशास्त्र, सागरी जीवन आणि भूदृश्य (लॅंड स्केपिंग) या विषयावरील ३ तज्ञ व्यक्तींची सभासद म्हणून प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने नेमणूक करावयाची असते. संस्थेच्या नियमावलीच्या नियम क्र.१२ प्रमाणे नामनिर्देशित सदस्यांच्या सदस्यत्वाचा कालावधी ३ वर्षाचा आहे. कार्यकारी समितीच्या दिनांक ०३ एप्रिल, २०१७ रोजी झालेल्या २५२व्या बैठकीमध्ये पर्यावरण शिक्षण, वनस्पतीशास्त्र, सागरी जीवन आणि भूदृश्य (लॅंड स्केपिंग) या विषयातील तज्ञ असलेल्या व्यक्तींपैकी श्रीमती डॉ. मनिषा कायंदे (प्राणीशास्त्र) (Zoology) व डॉ.सी.एस. लट्टू (वनस्पतीशास्त्र) (Botony) या व्यक्तींची महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर नामनिर्देशन करण्यात आले व एका सदस्याचे नामनिर्देशन करण्याबाबत कार्यकारी समितीच्या सदस्यांनी/ निमंत्रितांची नावे सुचवावी असे मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी निर्देश दिले. त्यास अनुसरून व्यवस्थापकीय संचालक, सिडको व महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी अनुक्रमे श्रीमती गीता सावंत (वनस्पतीशास्त्र), गार्डन ऑफीसर, सिडको व श्रीमती सुप्रभा प्रभाकर मराठे, (पर्यावरण), उप-प्रमुख अभियंता (स्थापत्य) पर्यावरण यांची नावे सुचविली आहेत. तसेच संचालक, महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्था यांनी डॉ. अनिल कमलाकर पाटील यांची वैयक्तिक माहिती (Bio Data) पाठविली आहे. उपरोक्त तज्ञांची वैयक्तिक माहिती बाब टिप्पणी सोबत जोडली आहे. तरी, महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर सदर संस्थेच्या नियमावलीचा नियम क्र.९ च्या पोट-नियम क्रमांक (अकरा), (बारा) आणि (तेरा) नुसार संस्थेच्या रिक्त असलेल्या एका जागेवर एका तज्ञ सदस्याचे नामनिर्देशन करणेबाबत प्रस्ताव कार्यकारी समितीच्या विचारार्थ सादर केला आहे.

९.२ महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर एका तज्ञ सदस्याचे नामनिर्देशन करण्याबाबत उपस्थित सर्व सदस्यांनी सविस्तर चर्चा केली. सदर चर्चेनंतर, श्री. जयंत कुमार बॉंठिया, सदस्य, कार्यकारी समिती

यांनी डॉ. अनिल पाटील यांचे नामनिर्देशन करण्याबाबत सुचविले व त्यास सर्व सदस्यांनी सहमती दर्शविली.

**निर्णय :** **चर्चेच्या अनुषंगाने, कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला : -**

**ठराव क्र.१३७९ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेच्या नियमावलीतील नियम क्र.९ चे पोट नियम क्र. (अकरा), (बारा) व (तेरा) व नियम क्र.१२ आणि त्यास सहाय्यभूत होणाऱ्या सर्व अधिकारांचा वापर करून कार्यकारी समिती याद्वारे डॉ. अनिल कमलाकर पाटील यांची महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवरील रिक्त असलेल्या जागी तज्ञ सदस्य म्हणून पुढील ३ वर्षांकरीता नामनिर्देशन करीत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**बाब क्र.१० : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील "प्रमुख, नगर नियोजन" या पदाच्या सेवाप्रवेश नियमास तसेच नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देण्याबाबत.**

१०.१ महानगर आयुक्त यांनी यासंदर्भात सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक १९ ऑक्टोबर,२०१६ रोजी झालेल्या १४१ व्या बैठकीतील ठराव क्र १३८२ अन्वये मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याकरीता नियोजन विभागांतर्गत प्रमुख, नगर नियोजन हे ₹ ३७४०० - ६७०००/- + ग्रे.वे ₹ ८९००/- या वेतन श्रेणीतील पद निर्माण करण्यात आले आहे.

१०.२ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाव्दारे मुंबई महानगर प्रदेशात राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे नगर नियोजन करण्याच्यादृष्टीने तसेच विशेष प्राधिकरणांतर्गत नियोजन विषयक कामे हाताळण्याच्या दृष्टीकोनातून मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याकरीता नियोजन विभागातंर्गत निर्माण केलेल्या "प्रमुख, नगर नियोजन" हे पद तातडीने भरणे आवश्यक असल्याने "प्रमुख, नगर नियोजन" पदाचे सेवाप्रवेश नियम खालीलप्रमाणे तयार करण्यात आले आहेत व सदर सेवाप्रवेश नियमास कार्यकारी समितीच्या मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे :-

| सेवाप्रवेश नियम | |
|---|---|
| मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील "प्रमुख, नगर नियोजन" या पदावरील नेमणूक सरळसेवेने अथवा पदोन्नतीने, योग्य व्यक्तींच्या सक्त निवडीने अथवा पदोन्नतीने खालील व्यक्तीमधून करण्यात येईल. | |
| **शैक्षणिक अर्हता :** | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची वास्तुविशारद (बी.आर्च.) **किंवा** स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवी **किंवा** तत्सम<br>**आणि**<br>२) मान्यताप्राप्त विद्यापीठ/संस्थेची नगर नियोजन, नगर रचना किंवा नगर व प्रादेशिक नियोजन मधील पदव्युत्तर पदवी/पदविका. |
| **अनुभव :** | पदव्युत्तर पदवी धारण केल्यानंतर किमान १५ वर्षे नगर नियोजनाचे कामकाज हाताळण्याचा अनुभव धारण करणाऱ्या व्यक्ती अथवा १० वर्षे जबाबदारीच्या पदावर कामकाज हाताळण्याचा अनुभव असणारी व्यक्ती.<br>**किंवा**<br>पी.बी.-४ — रु.३७४००-६७००० + ग्रे.पे.८७००/- या वेतनश्रेणीत कार्यरत असलेले "सह प्रकल्प संचालक (नगर नियोजन)",अति.प्रमुख (नगर व क्षेत्र नियोजन)", "अति.प्रमुख (अर्बन डिझाईन)" या पदावर किमान ५ वर्षाचा अनुभव धारण करीत असलेली व्यक्ती. |
| **वय :** | ५० वर्षापेक्षा जास्त नसावे. प्राधिकरणातील कर्मचाऱ्यास वयाची अट लागू नाही. |

१०.३ त्यानुसार **"प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन "** हे पद पदोन्नतीने भरण्याकरीता विभागीय पदोन्नती समितीची बैठक शुक्रवार दिनांक २८ डिसेंबर,२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झाली. सदर विभागीय पदोन्नती समितीने **"प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग"** या पदावर पदोन्नतीने नियुक्ती करण्याकरीता खालील अधिका-यांची प्राधान्याने शिफारस केली होती :-

१. श्री.शं.चं.देशपांडे, सह प्रकल्प संचालक (नगर नियोजन)

२. श्री. एम जी.सोनार, अतिरिक्त प्रमुख (नगर व क्षेत्र नियोजन)

प्राधान्यक्रम-१ अनुसार श्री. शं.चं.देशपांडे यांना प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग या पदावर पदोन्नती समितीच्या अहवालानुसार पदोन्नती देण्यात आली. सदर पदोन्नतीस दिनांक ०५/०१/२०१९ रोजी झालेल्या २६० व्या बैठकीत ठराव क्र.१३६९ अनुसार श्री. देशपांडे यांचे पदोन्तीस कार्यकारी समितीने कार्योत्तर मंजुरी देण्यात आली होती. त्यावेळी श्री.एम.जी.सोनार, अति,प्रमुख(नगर व क्षेत्र नियोजन) हे सुध्दा प्रमुख पदासाठी पात्र ठरत होते. सद्यस्थितीत प्रकल्पांच्या कामाची गती व तीव्रता विचारात घेता प्रमुख, नगर नियोजन या पदावर तातडीने नेमणूक करणे गरजेचे असल्याने श्री. एम. जी. सोनार, अति.प्रमुख (नगर व क्षेत्र नियोजन) यांना "प्रमुख, नगर नियोजन" या पदावर

पी.बी. IV ₹ ३७,४००-६७००० + ग्रेड वेतन ₹८९००/-(सातव्या वेतन आयोगानुसार वेतनस्तर एस-२९ - ₹१३११०० - २१६६००) या वेतनश्रेणीत कार्यकारी समितीची मान्यता मिळेल या गृहितकाच्या अधीन राहून तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून दिनांक २९ मे,२०१९ पासून तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देण्यात आली आहे.

१०.४ महानगर आयुक्त यांनी समितीच्या असे निर्देशनास आणून दिले की, कार्यकारी समितीच्या दिनांक ०५ सप्टेंबर, २०१८ रोजी झालेल्या २५९व्या बैठकीमधील ठराव क्रमांक १३६० अन्वये प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग यांच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये दुरूस्ती करण्यात आली होती. प्रमुख, नगर नियोजन व प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग ही दोन्ही पदे समकक्ष असल्याने प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन या पदाच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये समानता आणणे आवश्यक आहे. त्यानुसार सेवाप्रवेश नियम तयार करण्यात आलेले आहेत.

**निर्णय :-** **बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १३८०:**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (एक) अन्वये प्राप्त झालेल्या व यासंबधी सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे "**प्रमुख, नगर नियोजन** " या पदाचे बाब टिप्पणीतील उल्लेख केलेल्या खालील सेवाप्रवेश नियमास मंजूरी देण्यात येत आहे :-

**सेवाप्रवेश नियम**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील "प्रमुख, नगर नियोजन" या पदावरील नेमणूक सरळसेवेने अथवा पदोन्नतीने, योग्य व्यक्तींच्या सक्त निवडीने अथवा पदोन्नतीने खालील व्यक्तीमधून करण्यात येईल.

**शैक्षणिक अर्हता :** १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची वास्तुविशारद (बी.आर्च.) **किंवा** स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवी **किंवा** तत्सम

**आणि**

२) मान्यताप्राप्त विद्यापीठ/संस्थेची नगर नियोजन, नगर रचना किंवा नगर व प्रादेशिक नियोजन मधील पदव्युत्तर पदवी/पदविका.

**अनुभव :** पदव्युत्तर पदवी धारण केल्यानंतर किमान १५ वर्षे नगर नियोजनाचे कामकाज हाताळण्याचा अनुभव धारण करणाऱ्या व्यक्ती अथवा १० वर्षे जबाबदारीच्या पदावर कामकाज हाताळण्याचा अनुभव असणारी व्यक्ती.

| | |
|---|---|
| | **किंवा** |
| | पी.बी.-४ – रु.३७४००-६७००० + ग्रे.पे.८७००/- या वेतनश्रेणीत कार्यरत असलेले "सह प्रकल्प संचालक (नगर नियोजन)",अति.प्रमुख (नगर व क्षेत्र नियोजन)", "अति.प्रमुख (अर्बन डिझाईन)" या पदावर किमान ५ वर्षाचा अनुभव धारण करीत असलेली व्यक्ती. |
| **वय :** | ५० वर्षापेक्षा जास्त नसावे. प्राधिकरणातील कर्मचाऱ्यास वयाची अट लागू नाही. |

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** श्री.एम.जी.सोनार, अति. प्रमुख, (नगर नियोजन) यांना "**प्रमुख, नगर नियोजन** " या पदावर पी.बी. IV ₹ ३७,४००-६७००० + ग्रेड वेतन ₹८९००/- (सातव्या वेतन आयोगानुसार वेतनस्तर एस-२९ - ₹१३११००-२१६६००) या वेतनश्रेणीत दिनांक २९ मे,२०१९ पासून दिलेल्या पदोन्नतीस याद्वारे कार्योत्तर मंजूरी देत आहे.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील निर्णयाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.११ अ : प्राधिकरणाकडे असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल दिनांक ०१ जानेवारी, २०१९ ते ३१ मार्च, २०१९**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाने १ जानेवारी, २०१९ ते दिनांक ३१ मार्च, २०१९ दरम्यान केलेल्या गुंतवणूकीची संक्षिप्त माहिती दिली. कार्यकारी समितीने १ जानेवारी, २०१९ ते दिनांक ३१ मार्च, २०१९ पर्यंतच्या गुंतवणूक अहवालाची नोंद घेतली.

**निर्णय :-** **सदर गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र.११ ब: प्राधिकरणाकडे असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल दिनांक ०१ एप्रिल, २०१९ ते ३० जून, २०१९**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाने १ एप्रिल, २०१९ ते दिनांक ३० जून, २०१९ दरम्यान केलेल्या गुंतवणूकीची संक्षिप्त माहिती दिली. मा. मुख्य सचिव तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी प्राधिकरणाने विविध संस्था/बँका यांच्याकडे ठेवलेल्या ठेवींचा आढावा घेतला. आढावा घेतल्यानंतर मा. मुख्य सचिव तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी निर्देश दिले की, प्राधिकरणाने सिकॉमकडे असलेल्या सर्व ठेवी तरलता सुरक्षेच्या दृष्टीने काढून घेण्यात याव्यात. त्यानंतर, कार्यकारी समितीने १ एप्रिल, २०१९ ते दिनांक ३० जून, २०१९ पर्यंतच्या गुंतवणूक अहवालाची नोंद घेतली.

**निर्णय :-** **सदर गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र.१२ : प्राधिकरणाच्या दिनांक ३१ मार्च, २०१९ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३१ मार्च, २०१९ रोजी संपणा-या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली.

**निर्णय :-** **प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.**

**पटल बाब क्र.१ : सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याअंतर्गत मुंबई महानगरपालिकेमार्फत उपलब्ध होणाऱ्या निधितून प्राधिकरणामार्फत करावयाच्या कामास मान्यता मिळण्याबाबत**

१.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्यांतर्गत कुर्ला ते वाकोला या उन्नत मार्गाचे काम हाती घेतले आहे व ३५% काम पूर्ण झाले आहे. सदर उन्नत मार्गाचे काम करताना सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्यावर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मिठी नदीवरील पुलांच्या रुंदीकरणाच्या कामामुळे उड्डाणपुलाच्या कामात अडथळा येत आहे.

१.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, सदर काम प्राधिकरणाने करावे अशी विनंती मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आली असून त्यासाठी लागणारा निधी बृहन्मुंबई महानगरपालिका देणार आहे. मिठी नदीवरील पुलाचे निष्कासित व रूंदीकरणाच्या उर्वरित कामाची अंदाजित किंमत रू.५१.८१ कोटी आहे. सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्यावरील उड्डाणपुलाची निविदा किंमत रू.४४९.५ कोटी आहे. या कामांमध्ये जलवाहिन्यांचे स्थलांतरण करणे, मल:विसर्जन वाहिन्यांचे स्थलांतर करणे, पुलाच्या पायाची भु-पातळी वाढणे, तसेच पुलाच्या उंचीमध्ये वाढ झाल्यामुळे सध्यापर्यंत रू.५८.८३ कोटी अतिरिक्त खर्च झालेला आहे. सदर खर्च हा पुलाच्या मूळ कामाच्या १३.२४% इतका वाढीव आहे. दिनांक २१/०७/२०१५ रोजीच्या २४५व्या बैठकीमध्ये ठराव क्र.१२७९ अन्वये कार्यकारी समितीने महानगर आयुक्तांना कामाच्या २०% इतक्या वाढीपर्यंतच्या खर्चास मान्यता देण्याचे अधिकार आहेत. तसेच, पुलाचे काम सद्यस्थितीत फक्त ३५% पूर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे. उर्वरित काम करताना भविष्यात कामाच्या खर्चामध्ये वाढ झाल्यास आयुक्तांना असलेल्या अधिकारांतर्गत मान्यता घेऊन काम करणे शक्य होईल. सद्यस्थितीत मिठी नदीच्या पुलाच्या कामात गती नसल्यामुळे व त्याचा परिणाम प्राधिकरणाच्या मूळ कामावर होत असल्याने

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सदर काम प्राधिकरणाने करावे अशी विनंती प्राधिकरणास करण्यात आली आहे. सदरचे काम भाग-१च्या ठेकेदारामार्फत केल्यास भाग-१ च्या किंमतीत २०% च्या वर वाढ होणार आहे. तरी, महानगर आयुक्त यांना २०% वाढीव खर्चाचा अधिकार अबाधित ठेवून मिठी नदी विस्तारीकरणाचे रू.५१.८१ कोटींचे काम सांताक्रुझ-चेंबुर जोडरस्त्याच्या भाग-१ च्या कंत्राटदाराकडून करून घेण्याकरीता सदर बाब कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे. मिठी नदी पुलाचे काम व त्यावरील उन्नत मार्गाचे काम एकत्रित करणे जास्त योग्य होणार आहे. सदरचे काम फेर निविदा काढून करावयाचे झाल्यास अंदाजित ६ ते ८ महिने कालावधी कार्यारंभ आदेश देणे पर्यंतच लागेल व त्यामुळे मूळ काम पूर्ण होण्यास बराच कालावधी लागेल. तसेच निविदा पध्दतीने काम केल्यास भाग-१ चा ठेकेदार व नविन ठेकेदार यांच्यात समन्वय साधणे व एकत्रितरित्या काम करून घेणे कठीण होईल व मूळ कामास जादा अवधी लागेल.

**निर्णय :** **सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १३८१**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून कार्यकारी समिती याद्वारे २०% वाढीव खर्चाचा अधिकार अबाधित ठेवून बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत उपलब्ध झालेल्या निधीतून मिठी नदी विस्तारीकरणाचे रू.५१.८१ कोटींचे काम सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याच्या भाग-१ च्या कंत्राटदाराकडून करून घेण्यास मंजूरी देण्यात येत आहेत. तसेच सदर कामाची निकड लक्षात घेता बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीची प्रतिक्षा न करता काम तात्काळ सुरू करण्यास सुध्दा मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

*********